**नि.दि.दा.क्र. ८८/२०२०**
**नि.क्र. ६३**

**वादी करीता सा.क्र.२ यांची जबानी**

मी सत्यप्रतिज्ञेवर शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे संपूर्ण नाव:-गिरी व्यंकटगिर बुध्दगिर,

वय:-६५ वर्षे, व्यवसाय:-शेती ,राहणार:-औराद शहा. ता.निलंगा जि.लातूर.

**वादी करीता पुढील सरतपास श्री.एम.आर.जगताप यांचे तर्फे**

१. मला आता खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ दि.०६/०७/२००६ चे दाखविले. व्यंकट भिंगोले यांनी वादी यांच्या हक्कात दि.०६/०७/२००६ रोजी खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ करुन दिले. त्या खरेदीखतावर मी साक्षीदार म्हणून सही केली आहे. त्यावर खरेदीखत लिहून घेणार म्हणून वादी यांची सही आहे. तसेच त्यावर लिहून देणार म्हणून व्यंकट भिंगोले यांची सही आहे. तसेच त्यावर व्यंकटराव बिराजदार व प्रदीप जाधव यांच्याही साक्षीदार म्हणून सहया आहेत. खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ मधील मजकूर खरा व बरोबर आहे. खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ **(नि.क्रं.६५)** वर आहे.

२. व्यंकट भिंगोले यांनी वादी यांना भुखंड विकला. वादी यांनी व्यंकट भिंगोले यांना रक्कम ₹२५०००/ मोबदला दिला. त्यानंतर व्यंकट भिंगोले व वादी यांच्यामध्ये खरेदीखत चुकल्यामुळे चुक दुरुस्ती दस्त झाला. तो चुक दुरुस्ती दस्त नोंदणी क्रं.३७६३/२००६ दि.१०/०७/२००६ आता मला दाखविला. त्यावर माझी साक्षीदार म्हणून सही आहे. त्यावर लिहून देणार म्हणून व्यंकट भिंगोले व लिहून घेणार म्हणून वादी यांची सहया आहेत. त्यावर बालाजी तुंगे यांची देखील साक्षीदार म्हणून सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो चुक दुरुस्ती दस्त नोंदणी क्रं.३७६३/२००६ दि.१०/०७/२००६ (**नि.क्र.६६)** वर आहे.

नि.दि.दा.क्र. ८८/२०२०
नि.क्र. ६३

<u>प्रतिवादी क्र.१ ते ३ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.के.व्ही.पंढरीकर यांच्या वतीने सुरू</u>

३. खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ (नि.क्रं.६५) सोबत अकृषी परवाना जोडलेला नाही हे म्हणणे खरे आहे. खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ (नि.क्रं.६५) व चुक दुरुस्ती दस्त नोंदणी क्रं.३७६३/२००६ (नि.क्र.६६) वर त्यातील नमूद मिळकतीचे मूळ मालक कोण आहेत हे दाखवणा-या कागदांची साक्षांकीत प्रत जोडलेली नाही, साक्षीदार स्वत: सांगतात त्याच्या छायांकीत प्रती जोडलेल्या आहेत.

४. खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ (नि.क्रं.६५) आणि चुक दुरुस्ती दस्त नोंदणी क्रं.३७६३/२००६ (नि.क्र.६६) या दोन्ही दस्तांचे मुद्रांक वादी यांनी आणले होते हे म्हणणे खरे आहे. खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ (नि.क्रं.६५) आणि चुक दुरुस्ती दस्त नोंदणी क्रं.३७६३/२००६ (नि.क्र.६६) या दोन्ही दस्तातील मजकूर वादी यांनीच सांगितल्याचे मला आठवत नाही. खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ (नि.क्रं.६५) आणि चुक दुरुस्ती दस्त नोंदणी क्रं.३७६३/२००६ (नि.क्र.६६) यातील मजकूर माझ्या समक्ष वादी यांनीच सांगितला हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकत खरेदीविक्रीचा व्यवहार हा रु.२५,०००/- मोबदल्याचा होता.

**प्रश्न-** वादी यांनी ती मोबदला रक्कम रु. २५०००/- व्यंकट भिंगोले यांना दुय्यम निबंधका समोर दिली काय ?

**उत्तर**- ती मोबदला रक्कम आगोदरच दिली होती.

ती मोबदला रक्कम केव्हा दिली हे मला माहिती नाही. मोबदला रक्कम देण्याघेण्याबाबत काहीही लिखापढी झालेली नाही. मोबदला रक्कम देण्याघेण्याबाबत माझ्या समक्ष काहीही झालेले नाही हे म्हणणे खरे आहे.

माझ्या व वादी मध्ये मैत्रीपुर्ण संबंध आहेत हे म्हणणे खरे आहे. खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ (नि.क्रं.६५) आणि चुक दुरुस्ती दस्त नोंदणी

क्रं.३७६३/२००६ (नि.क्र.६६) हे मी दुय्यम निबंधक कार्यालयात जाण्यापुर्वीच टंकलिखीत केला गेला होता हे म्हणणे खरे नाही. चुक दुरुस्ती दस्त नोंदणी क्रं.३७६३/२००६ (नि.क्र.६६) हा आज रोजी प्रत्यक्ष पाहिल्यानंतरच खरेदीखतात काय चुका होत्या हे माझ्या निदर्शनास आले हे म्हणणे खरे आहे. खरेदीखतात काय चुका होत्या हे मला सांगण्याचा योग आजतागायत कोणालाही आला नाही हे म्हणणे खरे आहे. खरेदीखत नोंदणी क्रं.३७२१/२००६ (नि.क्रं.६५) आणि चुक दुरुस्ती दस्त नोंदणी क्रं.३७६३/२००६ (नि.क्र.६६) हे दस्त कोठे व कोणी टंकलिखीत केले हे मला माहिती नाही, साक्षीदार स्वत: सांगतात त्यांच्या हाताखालच्या व्यक्तीने दस्त टंकलिखीत करुन आणले.

दावा मिळकतीत औराद ते कोठमाळ पाणंद रस्ता आहे हे म्हणणे खरे नाही. वादी यांनी त्या औराद ते कोठमाळ पाणंद रस्त्यावर ८५.६ मीटर अतिक्रमण केले हे म्हणणे खरे नाही. खरेदीविक्रीचा व्यवहार झाला, व मी दस्तावर साक्षीदार आहे एवढेच मला माहिती आहे. वादीने खरेदीदस्तात नमूद असलेल्या मिळकतीवर घर बांधकाम केलेले नाही हे म्हणणे खरे नाही.

सर्वे नंबर १०८ व सर्वे नंबर ११६ मधून जाणारा जुना पाणंद रस्ता होता हे मला माहिती नाही. वादी यांनी पाणंद रस्ता नाही म्हणून दावा दाखल केलेला आहे. मी तयार दस्तांवर सहया केल्या हे म्हणणे खरे आहे. वादी माझे मित्र असल्यामुळे त्यांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

प्रतिवादी क्रं.४ ते ६ व त्यांचे विधिज्ञ पुकारले असता गैरहजर. त्यांच्या वतीने अर्जही नाही. करिता प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी क्रं.४ ते ६ यांच्या वतीने होणा-या उलटतपासाविना पुढे चालेल असा आदेश करण्यात येतो.

<u>उलटतपास पूर्ण</u>.

<u>फेरतपास नाही</u>.

**नि.दि.दा.क्र. ८८/२०२०**
**नि.क्र. ६३**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.07.18 12:52:15 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक १६/०७/२०२५.